1 एस.सी.सी. ३९६/२०२२
सरकार वि. सागर देशमुख.
**निशाणी १५ सोबत**

**<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र. २ याची जबानी</u>**
**<u>मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,</u>**

| | |
|---|---|
| माझे नाव – प्रदिप दत्तात्रय देशमुख, | वय – ६६ वर्ष, |
| व्यवसाय – शेती, | राहणार – अकोले, |
| तालुका – अकोले, | जिल्हा – अहमदनगर. |

**<u>सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत</u> –**

१. घटना सन २०२० मध्ये संध्याकाळी ०७:०० वाजता घडली होती. त्यावेळी मी कोल्हार–घोटी रोडला फिरण्यासाठी गेलो होतो. त्यावेळी मला धक्का लागल्याने खाली पडलो व बेशुध्द झालो. त्यानंतर काय झाले हे मला माहीती नाही. पोलीसांना माझा जबाब नोंदवला नव्हता.

*(साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास भारतीय साक्षीपुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)*

**<u>उलटतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत</u> –**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २२.०६.२०२२ रोजी संध्याकाळी ०७:०० वाजता मी अकोले–राजुर रस्त्याने पायी जात असताना मला चारचाकी गाडीने पाठीमागून धडक दिली. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या हातापायाला, डोक्याला, तोंडाला मार लागला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर चालकाने मला अकोले येथील ग्रामीण रुग्णालयात आणले. हे मला आठवत नाही की, माझी पत्नी तेथे आली व तिने मला

वाहन क्र. एम.एच ०४ एच.एक्स ९६०८ या वाहनाने धडक दिली व त्या वाहन चालकाचे नाव सागर विजय देशमुख असल्याचे सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, मला संगमनेर येथील आरोटे हॉस्पीटल येथे उपचाराकरीता दाखल केले व दिनांक २५.०६.२०२२ रोजी मला डिसचार्ज दिला.

३. आता मला माझ्या जबाबामधील अधोरेखांकित भाग 'अ' मधील मजकुर वाचुन दाखवण्यात आला. तो मी पोलीसांना सांगितला नव्हता. पोलीसांनी तो माझ्या जबाबामध्ये का नमुद केला याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा मजकूर मी पोलीसांना सांगितला होता व तो पोलीसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे नमूद केला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यामध्ये व आरोपीमध्ये न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्यामध्ये तडजोड झाली असल्यामुळे आरोपीला शिक्षा होऊ नये म्हणुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एस. एस. साबळे यांच्या मार्फत</u>**

उलटतपास नाकारला.
फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2026.02.02 17:55:01 +0530

दिनांक ०२.०२.२०२६
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
कोर्ट नं. २, अकोले.